महाराष्ट्र शासन

क्रमांक- कृबास-१२१८/प्र.क्र.२३०/२१-स,
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
दिनांक :- १२.०४. २०१९

<u>संदर्भ</u>:- (१) पणन संचालक, पुणे यांचे जा.क्र.पणन-५/कृउबास/नागपूर/निवडणूक/६१५/१९, दि.११.०२.२०१९.

(२) राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे जा.क्र.रासनिप्रा/कक्ष-१०/कृउबास/ नागपूर/२७६२/२०१९, दि.२८.०२.२०१९.

(३) जिल्हा उप निबंधक, नागपूर यांचे जा.क्र.जिउनिना/पणन/बाजार समिती/निवडणूक/माहिती/ ४५०६/ २०१९, दि.२६.३.२०१९.

आदेश

<u>महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ आणि नियम १९६७</u>

ज्याअर्थी, राज्यातील बहुतांश भागात गंभीर दुष्काळाचे सावट आहे तसेच लोकसभा-२०१९ च्या सार्वत्रिक निवडणूकीचा कार्यक्रम जाहिर झालेला असून दि.१०.०३.२०१९ रोजीपासून देशात आदर्श आचारसंहिता सुरु आहे. त्यामुळे महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ कलम १४ (३-अ) च्या तरतूदीनुसार कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूका काही कालावधीपर्यंत पुढे ढकलणे आवश्यक असल्याची शासनाची खात्री झाली आहे; आणि,

ज्याअर्थी, टंचाई, दुष्काळ, पूर आग किंवा इतर कोणतेही नैसर्गिक आपत्ती किंवा पावसाळा यामुळे किंवा राज्य विधानमंडळाचा किंवा संसदेचा किंवा एखाद्या स्थानिक प्राधिकरणाचा कोणताही निवडणूक कार्यक्रम आणि कोणत्याही बाजार समितीचा निवडणूक कार्यक्रम एकाच वेळी आल्यामुळे, किंवा राज्य शासनाच्या मते विशेष असेल अशा इतर कारणांमुळे लोकहितास्तव कृषि उत्पन्न बाजार समितीच्या निवडणूका एका वेळी सहा महिन्यापेक्षा अधिक नसेल इतक्या कालावधीपर्यंत पुढे ढकलण्याचे महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ कलम १४ (३-अ) च्या तरतूदीनुसार राज्य शासनास अधिकार प्राप्त आहे; आणि,

त्याअर्थी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ कलम १४ (३-अ) च्या तरतूदीअन्वये प्राप्त अधिकारांनुसार महाराष्ट्र शासन असे आदेश देत आहे की :-

राज्यातील ज्या कृषि उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकांसंदर्भात मा. उच्च न्यायालय किंवा मा.सर्वोच्च न्यायालयाने निवडणुका घेण्यासंदर्भात निश्चित असे आदेश दिलेल आहेत तसेच ज्या बाजार समित्यांचे निवडणूकीसंदर्भात महाराष्ट्र राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण यांच्या आदेशानुसार

जिल्हाधिकारी किंवा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांनी महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) नियम, १९६७ च्या नियम ४३(१) अन्वये निवडणूकीची कार्यवाही सुरु केली आहे अशा बाजार समित्या वगळून, अन्य ज्या कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या संचालक मंडळाच्या निवडणूका नियत झाल्या आहेत, अशा बाजार समितींच्या निवडणूका या आदेशाच्या दिनांकापासून दि.३१.०५.२०१९ रोजीपर्यंत पुढे ढकलण्यात येत आहेत.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०४१५१२२८४४३६०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

KALU GONYA VALVI

Digitally signed by KALU GONYA VALVI
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=714701fc3db9c38a46f4cd82e1e450b51a9e92eede8c323934f82edb538d3b20, postalCode=400032, street=MANTRALAYA , MUMBAI , serialNumber=8c5d0f275c3d9a21db07fecf7919c2d83796e88930d62d44e7a4a6d4cbee7e0e, ou=CO OPERATION MARKETING AND TEXTILE DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=KALU GONYA VALVI
Date: 2019.04.15 12:33:20 +05'30'

(का.गो.वळवी)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१. सर्व जिल्हाधिकारी,
२. पणन संचालक,महाराष्ट्र राज्य,पुणे.
३. सचिव, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, गुलटेकडी, पुणे.३७
५. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर
६. सर्व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था
७. निवड नस्ती (कार्या-२१-स)